* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

दि.१०.०३.२०१९

---

**लोकसभा निवडणुक – २०१९ अनुषंगाने पोलीस मुख्यालय वाशिम येथे प्रशिक्षण सत्राचे आयोजन**

आगामी नजीकचे काळात देशात लोकसभा निवडणुक २०१९ प्रस्तावीत असुन निवडणुक संबंधाने पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी यांना ज्ञान अवगत असणे आवश्यक आहे.सदर बाब लक्षात घेवुन पोलीस अधिक्षक वाशीम यांचे मार्गदर्शनाखाली वाशीम पोलीस दलातर्फे लोकसभा निवडणुक २०१९ संबंधाने खास प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते.सदर चे प्रशिक्षण सत्र पोलीस मुख्यालय वाशीम येथे दिनांक २२.फेब्रुवारी,.२०१९ पासून सुरु असुन,दिनांक २२. फेब्रुवारी,.२०१९/ २३.फेब्रुवारी २०१९/ ०५.मार्च.२०१९/०७.मार्च.२०१९/ १० मार्च २०१९ रोजी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. आज पावेतो वाशीम जिल्हयातील एकुण ७७ पोलीस अधिकारी, ७०४ पोलीस कर्मचारी व ३८६ होमगार्ड सैनिक यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

आज दिनांक १०/०३/२०१९ रोजी लोकसभा निवडणुक –२०१९ संबंधाने प्रशिक्षण सत्राचे पोलीस मुख्यालय वाशीम येथे आयाोजन करण्यात आले होते.प्रशिक्षणासाठी २२ पोलीस अधिकारी, २२८ पोलीस कर्मचारी व १२७ होमगार्ड सैनिक हजर होते. प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी , कर्मचारी यांना निवडणुक संदर्भाने प्रशिक्षण देण्यासाठी अपर पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार चव्हाण,पोलीस निरीक्षक श्री.एस.जी.घुगे जिल्हा विशेष शाखा वाशीम हे उपस्थीत होते. अपर पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार चव्हाण यांनी उपस्थित पोलीस अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षणार्थी यांना मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

PSI

पोलीस निरीक्षक

स्थानीक गुन्हे शाखा वाशीम